


# कृष्णा एक्सप्रेस

संपादक - गोरख काशिनाथ तावरे



* कराड (जि.सातारा) * वर्ष - १ ले. * अंक २७३ वा. * बुधवार दि.०७ मे २०२५ * पृष्ठे ४ * किंमत : १ रुपये * RNI NO : MAHMAR/2024/86610

* Karad (Dis.Satara) * Vol - 1 * Ishue - 273 * Wednesday 07 May 2025 * Page - 4 * Price - 1 Rs. * RNI NO : MAHMAR/2024/86610

# यशवंत सहकारी बँक आर्थिक घोटाळ्याची सीबीआयतर्फे चौकशी करावी

## केंद्रीय सहकारी मंत्री अमित शाह यांच्याकडे मागणी

## सहकार परिषदेचे माजी अध्यक्ष शेखर चरेगावकर मुख्य घोटाळेबाज

**कराड : यशवंत सहकारी बँकेच्या १४० कोटीपैकी १२७ कोटींचे कर्ज बँकेचे तत्कालीन अध्यक्ष शेखर चरेगवाकर यांच्या कुटूबियांसह त्यांनी स्थापन केलेल्या बनावट संस्थांच्या नावावर आहेत. त्या संबधितांच्या नावावर व्यवहार झाल्याचे ऑडीट रिपोर्टही आहेत. त्यामुळे बँकेत आर्थिक घोटाळा झाला आहे. त्याची सीबीआयतर्फे चौकशी करावी. अशी मागणी केंद्रीय सहकारी मंत्री अमित शाह यांना भेटून केली आहे. राज्यसभेच्या खासदार मेधाताई कुलकर्णी यांचे महत्वाचे सहकार्य मिळाले आहे. गृहमंत्री शाह यांनीही दोन महिन्यात सिबीआयतर्फे त्या सगळ्याची चौकशी करू, असे अश्वासन दिले आहे. अशी माहिती ठेवीदार संघटनेचे अॅड. निलेश जाधव, एस. डी. कुलकर्णी यांनी पत्रकार परिषदेत दिली.**



यशवंत बँकेच्या विरोधात ठेवीदार, कर्जदार न्यायालयासहीत पोलिस व अन्य पातळ्यांवर लढा देत आहेत. त्याची माहिती देण्यासाठी अॅड. जाधव यांनी पत्रकार परिषद घेतली. त्यावेळी फसवणुक झालेले ठेवीदाार, कर्जदारही उपस्थित होते.

अॅड. जाधव म्हणाले, सुमारे दिड वर्षापासून सातत्याने यशवंत बँकेचे सभासद, ठेवीदार व कर्जदार बँकेतील घोटाळ्याबाबत पाठपुरावा करीत आहोत. त्या अनुषंगाने केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री शाह यांची राज्यसभेच्या खासदार डॉ. कुलकर्णी यांच्या पुढाकाराने दोन दिवसापूर्वी भेट झाली. त्यांच्याशी बैठक झालेल्या बैठकीत खासदार डॉ. कुलकर्णी, मी स्वतः व बँकेचे सभासद संजीव कुलकर्णी उपस्थित होतो. यावेळी गृहमंत्री शाह यांच्याबरोबर बँकेत झालेल्या प्रकाराबाबत सविस्तर चर्चा केली. त्यावेळी त्यांनी या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेतली आहे. बँकेच्या आर्थिक व्यवहाराची सीबीआय चौकशी व्हावी. अशी मागणी यावेळी केली. त्यावरही गृहमंत्री श्री. शाह सकारात्मक आहेत. येत्या दोन महिन्यात सगळ्या प्रकरणात लक्ष घालण्याचे अश्वासन दिले आहे.

अॅड. जाधव म्हणाले, यशवंत बँकेच्या घोटाळ्याची पध्दत वेगळी आहे. त्यासाठी त्यांनी गरजू व ओळखीच्या लोकांना फसवले आहे. विठ्ठल कुलकर्णी व शार्दुल उर्फ मुकुंद चारेगांवकर व तत्कालीन अध्यक्ष शेखर चारेगांवकर अशा तिघा बंधूंनी बनावट कंपन्या स्थापन केल्या आहेत. त्याव्दारे कोट्यावधी रुपयांची बेनामी कर्ज प्रकरणे वितरीत केली आहेत. त्या कर्जांना कोणतेही पुरेसे तारण घेतेलेले नाही. कोणत्याही नियमांचे पालन केलेले नाही. त्यामुळे ती कर्जे घाईघाईने वितरीत केली आहेत. त्याच्या रक्कमा कर्जदारांच्या कर्ज खात्यावरून त्यांच्या बनावट कंपनांच्या खात्यावर वर्ग केल्या आहेत. त्याची सगळ्याची सखोल चौकशीची गरज आहे. ऑडीट रिपोर्टमध्ये या बाबी अनियमितता दर्शवून येथील यंत्रणाही त्यावर पांघरून घालण्याचा प्रयत्न करत आहे.

त्यामुळे त्या यंत्रेवरही आमची तक्रार आहे. त्यांचीही चौकशी व्हावी. असा आमचा आग्रह आहे. घोटाळ्याची व्याप्ती मोठी आहे. त्यात अन्य बँकाही अडकल्या आहेत. यशवंत बँकेमध्ये सुमारे १२५ कोटींची कर्जे बेनामी आहेत. ती कर्जे ज्या कंपन्यांना वाटली आहेत. त्या कंपन्या अस्तीत्वात नाहीत. ती कर्जे त्यांनी नातेवाईकांना वाटली. जे कर्जदार फसले आहेत. त्यांच्या नावाने ती कर्जे वितरीत केली आहेत. बुलढाणा जिल्ह्यातील चिखली अर्बन बँक, वाई येथील वाई अर्बन बँक, यवतमाळ येथील यवतळमाळ अर्बन बँक, वारणा सहकारी बँक, डोंबीवली येथील कांचन गौरी पतसंस्था, कोपरगांव येथील समता पतसंस्था, पुणे सरस्वती महिला पतसंस्था यांच्यासह आणखीही काही संस्थाचा त्यात समावेश आहे.

त्यांच्याकडून कर्ज घेतली आहेत. ती खोटी आहेत. त्यामुळे त्या संस्थांही अडचणीत आल्या आहेत. या संस्थेच्या कर्ज प्रकरणांचा वापर करून दापोली तालुक्यातील बुरुंडी येथे चरेगवाकरांनी मोठी जमीन खरेदी केली. त्यासह इंदापूर, करमाळा, खेड शिवापूर, भिगवण विंग आणि कऱ्हाडच्या रुक्मिणीनगर येथीही स्थावर मालमत्ता खरेदी केली आहे.

यशवंत प्रतिष्ठान, स्वयंसिद्धा पतसंस्था, यशवंत महिला स्वयंरोजगार प्रतिष्ठान व यशवंत प्रतिष्ठान आदी संस्थांच्या माध्यमातून कोट्यावधी रुपयांचे गैरव्यवहार झाले आहेत. यशवंत महिला स्वयंरोजगार प्रतिष्ठानच्या माध्यमातून हजारो महिलांच्या नांवावर कोट्यावधींची कर्जाची उचलून त्यांनी रक्कमेचा अपहार केला आहे. प्रत्यक्षात त्या संस्था कोठेही दिसत नाहीत.

यशवंत सहकारी बँक सध्यस्थितीत मागील वर्षाच्या अहवालानुसार बँकेचा एनपीए ५० टक्क्यावर गेला आहे. बँकेचा तोटा ६० कोटीहून पुढे गेला आहे.

ऑडीट रिपोर्टनुसार बँकेची आर्थिक स्थिती भयावह आहे. असे असतानाही बँकेचे संचालक व कर्मचारी जबरदस्तीने कर्ज वसुलीसाठी दबाव तंत्राचा वापर करीत आहेत. त्यामुळे या सगळ्याचा विचार करून शासनाने सीबीआय व आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागातर्फे योग्य चौकशी व्हायला हवी. त्यासाठी ठेवीदार व सभासद व फसलेले कर्जदार प्रयत्न करत आहेत. मात्र त्याचा फारसा प्रभाव पडताना दिसत नाही.

**यशवंत बँकेचे चेअरमन शेखर चरेगावकर हे भारतीय जनता पार्टीचे कार्यकर्ते असून त्यांनी सहकार परिषदेचे अध्यक्ष पद भूषवले आहे. या कालखंडामध्ये त्यांनी अनेक बँकांना गंडा घातला आहे. मंत्री चंद्रकांत पाटील यांचे खास विश्वासू म्हणून पश्चिम महाराष्ट्रात शेखर चरेगावकर यांची ओळख आहे.**

# छायाचित्र प्रदर्शनातून सातारा जिल्ह्यातील पर्यटन स्थळांचे घडले दर्शन





सातारा : पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली महाबळेश्वर येथे घेण्यात आलेल्या महापर्यटन उत्सवात जिल्हाधिकारी संतोष पाटील यांच्या संकल्पनेतून आणि जिल्हा माहिती कार्यालयाच्या मेहनतीतून महाबळेश्वर येथील पेटीट लायब्ररी येथे सातारा जिल्ह्यातील विविध पर्यटन स्थळांच्या छायाचित्रांचे प्रदर्शन मांडण्यात आले. हे प्रदर्शन अत्यंत सुंदर व जिल्ह्यातील गड किल्ले, ऐतिहासिक, सांस्कृतिक पर्यटन स्थळे यांचे समग्र दर्शन घडविणार आहे. पर्यटन उत्सावामध्ये असंख्य पर्यटकांनी भेट देऊन कौतुक केले आहे, असे प्रतिपादन पर्यटन विभागाचे संचालक बी.एन. पाटील यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा माहिती कार्यालयाच्यावीने छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. पर्यटन विभागाचे संचालक श्री. पाटील यांनी भेट दिली. त्यांच्या समवेत जिल्हाधिकारी संतोष पाटील, प्रांताधिकारी राजेंद्र कचरे, जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे उपस्थित होते. महाबळेश्वर पाचगणीसह सर्व पर्यटन स्थळांचा आस्वाद छायाचित्रांमधून मिळतो. हे प्रदर्शन कायमस्वरूपी जिल्हाधिकारी कार्यालयात मांडण्यात येणार आहे असे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सांगितले. शासकीय इमारतींच्या भिंती केवळ भिंती न राहता त्या जिवंत व्हाव्यात आणि त्यांनी इतिहास, संस्कृती, निसर्ग सौंदर्य याविषयी येणाऱ्यांशी हितगुज करावे यासाठी जिल्हाधिकारी संतोष पाटील यांची ही संकल्पना खरोखरच नाविन्यपूर्ण आहे. हे प्रदर्शन अत्यंत अल्प कालावधीमध्ये उभे करण्यात जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे आणि त्यांच्या संपूर्ण टीमचे अत्यंत मोलाचे सहकार्य आहे.

प्रदर्शनामध्ये प्रामुख्याने योगेश चौकवाले, प्रेक्षित गांधी, संजय दस्तुरे, रमण कुलकर्णी, अशोक कांबळे, विष्णु शिंदे, चंद्रकांत खंडागळे, मनोज सिदमुल,जयश्री चौकवाले, सेजल चौकवाले, ऋता कलमनकर, वैभव देशमुख, अभय हवालदार यांच्या छायाचित्रांचा समावेश आहे.

# संजीवनी विद्यामंदिराच्या जीर्णोद्धारासाठी माजी विद्यार्थी, ग्रामस्थ एकवटले

## कायापालट करून गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नव्या पर्वाची सुरुवात

शेणोली : शेणोली (ता. कराड) येथील संजीवनी शिक्षण संस्था संचलित संजीवनी विद्यामंदिर शाळा हे गावातील एक जुने, प्रतिष्ठित आणि अनेक यशस्वी विद्यार्थी घडवणारे शैक्षणिक केंद्र आहे. मात्र गेल्या काही वर्षांत बदलत्या शैक्षणिक स्पर्धेमुळे शाळेच्या भौतिक व शैक्षणिक स्थितीत घसरण झाली होती. आता या शाळेचा जीर्णो द्धार करण्यासाठी गावकरी, माजी विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थ उत्स्फूर्तपणे पुढे सरसावले आहेत.

१९६६ च्या सुमारास शेणोली,शेरे,सोनकीरे,पाडळी ,नेर्ले,कापील गोळेश्वर आणि परिसरातील शिक्षणप्रेमी आणि समाजभिमुख नागरिकांनी मिळून संजीवनी शिक्षण संस्था स्थापन केली. त्यामध्ये संजीवनी विद्यामंदिर शाळेचा जन्म झाला. ही शाळा म्हणजे गावाच्या प्रगतीचा पाया ठरली. आजवर या शाळेतून हजारो विद्यार्थी घडले असून अनेकांनी शासकीय सेवेत, विविध व्यवसायांमध्ये, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय यश मिळवले आहे. अनेक माजी विद्यार्थी आज देश-विदेशात आपल्या कार्याने गावाचे नाव उज्ज्वल करत आहेत.

सहविचार सभेतून प्रेरणा आणि कृतीची दिशा अलीकडेच शेणोली ग्रामपंचायतीमध्ये शाळेच्या जीर्णोद्धारासाठी एक सहविचार सभा आयोजित करण्यात आली. या सभेस गावातील शिक्षक, शाळेचे मुख्याध्यापक, माजी विद्यार्थी, ग्रामस्थ आणि ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये शाळेच्या डागडुगीपासून ते आधुनिक शिक्षणासाठी आवश्यक असलेल्या सुविधा, संगणक कक्ष, विज्ञान प्रयोगशाळा, डिजिटल शिक्षण साहित्य, मुलांसाठी खेळाचे साहित्य, शाळेचे गेट आणि परिसराचे सौंदर्यीकरण आदी मुद्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या उपक्रमात शाळेतील सर्व शिक्षक आणि मुख्याध्यापक यांनी आपला एक महिना पगार शाळेसाठी देण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या या समर्पणाला माजी विद्यार्थ्यांनी आणि ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. अनेक माजी विद्यार्थ्यांनी आर्थिक मदत देण्याचे जाहीर केले आहे. काहींनी बांधकाम साहित्य, संगणक उपकरणे किंवा कामासाठी श्रमदान करण्याची तयारी दर्शवली आहे.

संजीवनी विद्यामंदिर जीर्णोद्धार या नावाने या उपक्रमाला सुरुवात झाली असून हे फक्त भिंतींचे नव्हे तर विद्यार्थ्यांच्या भविष्याचे नव्याने पुनर्निर्माण आहे. ही मोहीम सामाजिक एकतेचा आणि शिक्षणासाठीच्या समर्पणाचा सुंदर नमुना ठरत आहे.

या उपक्रमाचा पहिला टप्पा म्हणजे शाळेची इमारत, वर्गखोल्या, टॉयलेट, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था यांचे दुरुस्ती काम आणि आवश्यक नवीन सुविधा उभारणे आहे. पुढील टप्प्यात शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आधुनिक शिक्षण साधनसामग्री, शिक्षक प्रशिक्षण, आणि स्पर्धा परीक्षांची तयारी यासाठी विशेष वर्ग आयोजित केले जाणार आहेत. गावातील सर्वच घटकांचा सहभाग, शिक्षकांचे समर्पण, माजी विद्यार्थ्यांचे योगदान हे या उपक्रमाचे खरे यश आहेत. ही शाळा पुन्हा एकदा गुणवत्तेची, संस्कारांची आणि यशाची पायरी बनवण्यासाठी शेणोलीकर एकजुटीने प्रयत्नशील आहेत.

## १३ मे रोजी कोकण विभागीय पेन्शन अदालत

**नवी मुंबई : कोंकण विभागातील पेन्शन अदालत दरमहा दुसऱ्या मंगळवारी आयोजित करण्यात येते. या महिन्यातील विभागीय पेन्शन अदालत मंगळवार दि. १३ मे २०२५ रोजी दुपारी ०२.०० वा. कोकण भवनातील कक्ष क्र. १०६ सामान्य प्रशासन शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय कोंकण भवन येथे आयोजित केली आहे.**

**या पेन्शन अदालतीमध्ये महसूल विभागातील सेवानिवृत्त शासकीय कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित पेन्शन प्रकरणांच्या अडचणींचे निवारण करण्यात येणार आहे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पेन्शन प्रकरणांबाबतच्या तक्रारी असल्यास सदर दिवशी त्याबाबतचे अर्ज स्वीकारले जातील. कोकण विभागातील पेन्शन धारकांनी या पेन्शन अदालतीला उपस्थित राहून पेन्शन विषयी आपले प्रश्न उपस्थित करावे. असे कोकण विभाग प्र.तहसिलदार,(सामान्य प्रशासन) नरेश जगताप यांनी प्रसिध्दी पत्रकान्वये कळविले आहे.**

# शंभू स्मारक उभारणीत उच्च दाब वाहिनीचा अडथळा

## स्मारक समितीचे आमदार डॉ.अतुलबाबा भोसले यांना निवेदन



कराड : शंभू तीर्थ चौकात स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारकाचे काम सुरू आहे. या जागेतील महावितरणची उच्च दाब वाहिनी, डी. पी. व पोलमुळे स्मारकाच्या बांधकामास अडथळा निर्माण झाला आहे. वीज तारा, डी. पी. व पोल हटवण्याबाबत नगरपालिका व महावितरणला सूचना कराव्यात, अशी मागणी स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारक समितीने आमदार डॉ. अतुलबाबा भोसले यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. समितीचे संस्थापक सचिव रणजीतनाना पाटील यांनी याबाबतचे निवेदन दिले. विश्वस्त प्रताप इंगवले, सागर आमले, सचिन वास्के, रोहित पंडित, महेश पाटील, सचिन पाटील, तेजस माने, प्रशांत बोरकडे उपस्थित होते.

याबाबत दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, कराड नगरपालिके अंतर्गत शंभूतीर्थ चौक येथे श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज स्मारक उभारणीचे काम सुरू करण्यात आले होते. त्यानंतर सदर काम सार्वजनिक बांधकाम विभाग कराड दक्षिणकडे हस्तांतर करण्यात आलेले आहे. सदर काम सध्या प्रगतीपथावर आहे. इमारतीच्या बांधकामात ईशान्य व वायव्य कोपऱ्यात महावितरण कंपनीच्या पोल तसेच डीपी आहेत.

सदर पोलवरुन व डीपीमधून मुख्य विद्युत प्रवाह तारा संभाजी महाराज स्मारक बांधकामाच्या वरून जात आहेत. विद्युत प्रवाह तारांमुळे सदर बांधकामाला अडथळा निमाण झाला आहे. जो पर्यंत सदर विद्युत प्रवाह तारा तेथून शिफ्ट होत नाहीत, तोपर्यंत स्मारकाचे त्याठिकाणाचे पुढील काम करता येत नाही. त्याठिकाणीच श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज यांचा पूर्णाकृती पुतळा उभा केला जाणार आहे.

या संदर्भात जिल्हाधिकारी यांच्या दालनात ६ सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार जिल्हाधिकार्यांनी कराड नगरपरिषदेला सदर कामाच्या ठिकाणी अडथळा ठरणारी महावितरण वाहिन्या (HT Line's) स्थलांतरित करून देण्याबाबत कराड नगरपरिषद यांना प्रस्ताव सादर करण्यास कळविलेले आहे.

त्यानंतर आज ८ महिने झाले तरीही सदर कामाच्या ठिकाणी अडथळा ठरणारी महावितरण कंपनीची उच्च दाब वाहिन्या स्थलांतरित करून मिळालेल्या नाहीत. त्यामुळे त्याठिकाणचे काम थांबले आहे. सदर अडथळा ठरणारारी महावितरणची उच्च दाब वाहिनी (HT Line's) स्थलांतरित करून त्याठिकाणचा पोल तसेच डीपी हे कंपौंड वॉलच्या बाहेरुन जोडण्यसाठी आदेश करावेत, अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे.

## संपादकीय....

### गरजुंना होणार मदत...!

सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंदर्भात दिलेल्या एका निर्णयामुळे. उशिरा का होईना; परंतु सर्वोच्च न्यायालयाने तारीख पे तारीखमध्ये न पडता निवडणुकांचा मार्ग मोकळा केला ते बरे झाले. त्याबदल सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत. सत्तेतून समाजकारण आणि समाजकारणातून विकासाची प्रगती व्हावी, यासाठी पंचायत राज कायदा करणाऱ्या भारत देशात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीतून निवडून आलेल्या प्रतिनिधींना जनतेचे प्रश्न मांडण्याची चांगली संधी मिळते. निधीचे वाटप गरजूंपर्यंत पोहोचण्यास मदत होते. महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदांच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. त्यातून लोकप्रतिनिधी निवडून येतात. महाराष्ट्रातील या निवडणुकांना गेले तीन ते साडेतीन वर्षे सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या एका याचिकेमुळे खो बसला होता. त्यामुळे आयुक्त दर्जाचा सनदी अधिकारी प्रशासकाच्या भूमिकेतून महापालिकेचा कारभार सांभाळत होता. लोकसभा, विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या होत्या. राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी दिल्याने, गुडघ्याला बाशिंग बांधून बसलेले राजकीय पक्षाचे माजी नगरसेवक, इच्छुक पदाधिकाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. त्याचबरोबर, नागरी सुविधासंदर्भात स्थानिक पातळीवर कोणाकडे बाजू मांडायची या विवंचनेत असलेल्या सर्वसामान्य नागरिकांना आधार मिळणार आहे. राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावर या निवडणुकांचे घोंगडं इतकी वर्ष प्रलंबित होते. मात्र, यंदाच्या निवडणुका घेताना, सन २०२२ मध्ये सादर झालेल्या बांठिया कमिशनच्या अहवालानुसार आधी अस्तित्वात असलेल्या ओबीसी आरक्षणानुसारच घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाकडून दिल्याने, ओबीसी आरक्षणाला सध्या तरी धक्का बसणार नाही, हे अधोरेखित झाले. १९९४ ते २०२२ पर्यंत ओबीसी आरक्षणाची जी परिस्थिती होती, तीच परिस्थिती कायम राहणार आहे. तसेच, सर्वोच्च न्यायालयाने या संदर्भातील याचिका पुढील सुनावणीसाठी ठेवली आहे. त्यावरील निकाल कधी लागेल हे आता सांगणे कठीण आहे. मात्र, यातून सुवर्णमध्य काढून सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्रात निवडणूक कार्यक्रम जाहीर करा असे आदेश राज्य निवडणूक आयोगाला देण्याचा शहाणपणा याआधी ज्यांच्याकडे हे प्रकरण सुनावणीसाठी आले त्यांनी घेतला असता तर, बरं झालं असते. बांठिया कमिशनच्या अहवालानंतर ऑगस्ट २०२२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांबाबत परिस्थिती 'जैसे थे' ठेवण्याचे निर्देश दिले होते. यासंदर्भात दाखल सर्व याचिकांवर मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. ज्यात केंद्र सरकारतर्फे सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी प्रलंबित निवडणुका व्हायला हव्यात, अशी भूमिका मांडली, तर विरोधक याचिकाकर्त्यांकडून ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ इंदिरा जयसिंह यांच्याकडून निवडणुका या २020 च्या बांठिया कमिशन रिपोर्टमधील शिफारशींनुसारच घ्याव्यात, असा युक्तिवाद करण्यात आला होता. राज्यात पाच वर्षांपेक्षा अनेक प्रकरणात प्रशासक कार्यरत आहे. लोकप्रतिनिधींनी लोकल बॉडी चालवल्या पाहिजेत अशी राज्यघटनेत तरतूद आहे. पण त्या विपरीत हे सुरू आहे. औरंगाबाद आणि नवी मुंबईत पाच वर्षांपेक्षा अधिक काळ प्रशासकांचा आहे, ही बाब सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आली होती. लोकशाहीसाठी हे योग्य नसल्याचे ही कोर्टाच्या लक्षात आले. विशेष म्हणजे सुनावणी दरम्यान ओबीसी आरक्षणाशी संबंधित कुठल्याही याचिकेचा या निवडणुकांवर परिणाम होणार नाही. कारण यापुढे येणारे निकाल हे न्यायालयाच्या अंतिम निकालावर अवलंबून असतील. आरक्षणाच्या मुद्द्यावर इतकी वर्षे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका न घेणे हे योग्य नाही.

# शंकरराव भोसलेंसारखा कामगार नेता पुन्हा होणे नाही : आ.जयंतराव पाटील

इस्लामपूर : कामगार नेते शंकरराव भोसले हे माझे जिवाभावाचे व विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य राज्यातील साखर कामगारांचे हितासाठी व्यतीत केले. त्यांनी कधीही कामगारांच्या प्रश्नांवर तडजोड केली नाही.असा कामगार नेता पुन्हा होणे नाही,या शब्दात माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

कासेगाव (ता. वाळवा) येथील कृष्णा नदीच्या तीरावर स्व. शंकरराव भोसले यांचा रक्षा विसर्जन विधी पार पडला. यावेळी राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर.पाटील,महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे, माजी जि.प.अध्यक्ष देवराज पाटील,राजाराम बापू साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील प्रामुख्याने उपस्थित होते.

आ.पाटील म्हणाले,राज्यातील साखर कामगारांचे प्रश्न सुटले पाहिजेत,त्यांना न्याय मिळाला पाहिजे यासाठी त्यांनी अखंड संघर्ष केला. त्याबरोबर ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देणारी सहकारी साखर कारखान दारीही टिकली पाहिजे,वाढली पाहिजे यासाठीही त्यांनी कष्ट घेतले. ते मितभाषी,नम्र होते. कामगारांचे प्रश्न समजून सांगण्याची त्यांची एक हातोटी होती. त्यांच्या जाण्याने राज्यातील साखर कामगारांची तसेच, कासेगाव व



राजारामबापू समूहाची मोठी हानी झाली आहे.

राज्य साखर संघाचे अध्यक्ष पी.आर. पाटील म्हणाले,शंकरराव भोसले हे अजात शत्रू होते. त्यांचे संघटन कौशल्य उत्तम होते. कामगारांच्या पगार वाढीचा निर्णय घेणाऱ्या समितीचा मी अध्यक्ष आहे,ते सदस्य होते. आमच्या तीन बैठका झाल्या आहेत. या समितीचा लवकरात-लवकर योग्य निर्णय करून आम्ही त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली अर्पण करू. महाराष्ट्र राज्य साखर कामगार प्रतिनिधी मंडळाचे अध्यक्ष तात्यासाहेब काळे म्हणाले, शंकरराव भोसलेसर हे कामगारांच्या हिताचा ध्यास घेतलेले जेष्ठ नेते होते. त्यांच्या अकाली जाण्याने राज्यातील साखर कामगार पोरका झाला आहे.

यावेळी माजी जि.प.अध्यक्ष देवराज पाटील,राजारामबापू साखर कारखान्याचे उपाध्यक्ष विजयराव पाटील,कासेगाव शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य आर.डी.सावंत, राजारामबापू सहकारी बँकेचे अध्यक्ष विजयराव यादव,राजारामबापू दूध संघाचे उपाध्यक्ष शशिकांत पाटील,कामगार नेते राऊ पाटील,प्रदीप शिंदे,तानाजीराव खराडे, विश्वासचे कामगार नेते दत्तात्रय पाटील, आरपीआयचे प्रताप मधाळे,प्रा.कृष्णा मंडले यांच्या अनेक मान्यवरांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी राज्याच्या साखर कामगार चळवळीतील नेते,राजारामबापू समूहातील पदाधिकारी,तसेच वाळवा तालुका व सांगली जिल्ह्यातून आलेले कार्यकर्ते,नातेवाईक व ग्रामस्थ उपस्थित होते.

# आ.जयंतराव पाटील यांच्या प्रयत्नातून इस्लामपूर आगाराला ५ नवीन बसेस



इस्लामपूर : राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष,माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या विशेष प्रयत्नातून इस्लामपूर आगाराला ५ नवीन बसेस मिळाल्या असून या नव्या ५ बसेसचे माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले.सांगली विभाग नियंत्रक सुनिल भोकरे, इस्लामपूर आगार व्यवस्थापक दिलीप ठोंबरे,मिलिंद कुंभार,दिपक यादव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी,कार्यकर्ते व प्रवासी उपस्थित होते. इस्लामपूर आगारास नव्या बसेस मिळाल्याने वाळवा तालुक्या तील प्रवासांचा प्रवास अधिक सुखकर होणार असून प्रवाशांमधून याबद्दल समाधान व्यक्त करण्यात आले.

आ.जयंतराव पाटील यांनी राज्याचे परिवहन मंत्री ना.प्रताप सरनाईक यांना १४ फेब्रुवारी २०२५ रोजी पत्र लिहून इस्लामपूर सह सांगली जिल्ह्यासाठी नव्या बसेसची मागणी केली होती. त्यानुसार सांगली जिल्ह्या स नव्या ४० बसेस मिळाल्या. आज त्यातील पहिल्या टप्प्यात ५ बसेस इस्लामपूर आगारा स मिळाल्या आहेत.

आ.जयंतराव पाटील यांनी सर्व बसेसचे पूजन करून श्रीफळ वाढविले. यावेळी त्यांनी इस्लामपूरहून अक्कलकोटला जाणाऱ्या बस मधून प्रवासही केला. या प्रवासात त्यांनी सांगली विभाग नियंत्रक सुनिल भोकरे, व इस्लामपूर आगार व्यवस्थापक दिलीप ठोंबरे यांच्यासमवेत प्रवाशांना दिल्या जाणाऱ्या विविध सुविधा व परिवहन विभागास येणाऱ्या अडचणीबद्दल सविस्तर चर्चा केली.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे इस्लामपूर शहराध्यक्ष शहाजी पाटील,जिल्हा सर चिटणीस बाळासाहेब पाटील,महिला जिल्हाध्यक्षा सुस्मिता जाधव,माजी नगर सेवक खंडेराव जाधव,पिरअली पुणेकर,युवक तालुकाध्यक्ष संग्राम जाधव,महिला शहराध्यक्षा पुष्पलता खरात,आयुब हवलदार,मनिषा पेठकर,सुप्रिया पेठकर, संदीप माने,बाळासो कोळेकर,राहुल नागे, प्रविण पाटील आदी उपस्थित होते.

# शिक्षणाचा झाला बाजार..पालक बेजार

## महाविद्यालये व खाजगी क्लासेसची अभद्रयुती



उंब्रज/रघुनाथ थोरात : महाविद्यालये व खाजगी क्लासेसच्या अभद्र युतीमुळे शिक्षण क्षेत्राचे बाजारीकरण झाले असून गरीब,सर्वसामान्य पालक वर्ग मात्र पुरता बेजार झाल्याचे चित्र आढळून येत आहे.त्यामुळे गरिबांनी शिक्षण घ्यायचे की नाही? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित होत आहे. लोकांनी लोकांसाठी चालवलेली राज्यव्यवस्था म्हणजे लोकशाही ही लोकशाहीची सरळ व्याख्या. परंतु,सध्याची व्यवस्था ही खरंच सर्वसामान्यांसाठी पोषक आहे का?

खरंच देशामध्ये लोकशाही नांदते का? हा संशोधनाचा विषय आहे. महाविद्यालयांनी खाजगी क्लासेसशी संगनमत करून शिक्षणाचा बाजार मांडल्यामुळे त्याचा आर्थिक फटका सर्वसामान्य पालकांना बसत आहे. या बाजारीकरणाला वेळीच पायबंध घातला नाही तर गरीब कुटुंबातील होतकरू,हुशार विद्यार्थ्यांचे भवितव्य अंधकारमय होऊन शिक्षण हे केवळ श्रीमंतांची मक्तेदारी बनून राहील. शिक्षणाच्या या नव्या अभद्रयुतीमुळे सर्वसामान्य पालकांच्या पाल्यांना दहावी नंतरचे उच्चशिक्षण घेणे अवघड होऊन बसले आहे. यापूर्वी काही हजारांमध्ये पूर्ण होणाऱ्या शिक्षणासाठी आता लाखो रुपये मोजावे लागत आहेत.आर्थिक सुबत्ता असलेल्या पालकांच्या खिशाला ही परवडणारी गोष्ट आहे.परंतु,सर्वसामान्य गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांनी करायचे काय? हा यक्ष प्रश्न सर्वसामान्य कुटुंबांपुढे आ वासून उभा आहे. ही अशीच परिस्थिती राहिली तर उच्च शिक्षण घेणे हे आर्थिक दुर्बल घटकांसाठी एक दिवास्वप्नच ठरू शकते. पूर्वी महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा अतिशय उच्च प्रतीचा होता. परंतु,हल्ली बोकाळलेल्या खाजगी अकॅडमीज,क्लासेसमुळे महाविद्यालयांचे वर्ग अक्षरशः ओस पडले आहेत. फक्त सर्वसामान्य घरातील विद्यार्थीच महाविद्यालयात शिक्षणासाठी जातात. बहुसंख्य विद्यार्थी हे अकॅडमी,क्लासेसमध्ये जात असल्यामुळे महाविद्यालयातील शैक्षणिक दर्जा ढासळल्याचे आढळते. त्यामुळे आपल्या पाल्याला उच्च दर्जाचे शिक्षण न मिळाल्यामुळे आपला पाल्य या स्पर्धेच्या युगात पाठीमागे तर राहणार नाही ना?या विवंचनेतून मग सर्वसामान्य पालक देखील प्रसंगी जमीन-जुमला,घर-दार,सोने-नाणे,आयुष्याची पुंजी पणाला लावून कर्जबाजारी होत अकॅडमी ज,खाजगी क्लासेसच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक लुटीस बळी पडत असल्याचे चित्र आढळून येत आहे. त्यामुळे आर्थिक दुर्बल कुटुंबातील पालक,विद्यार्थ्यांनी वेळीच जागे होऊन या शिक्षण माफीयांनी केलेल्या शिक्षणाच्या बाजारीकरणाविरुद्ध आवाज उठवून उच्च शिक्षणाची दारे सर्वसामान्य गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या आवाक्यात आणणे, खुली करणे काळाची गरज आहे. तरच खऱ्या अर्थाने राष्ट्रात लोकशाही नांदेल, विषमता नष्ट होऊन समानता रूजेल हेच खरे..!

**शिक्षणाचा नवा ट्रेंड..!**

**महाविद्यालयात फक्त कागदोपत्री प्रवेश घ्यायचा अनं लाखो रुपये भरून खाजगी क्लासेस,अकॅडमी जॉईन करायची. त्यानंतर महाविद्यालयाने सदर विद्यार्थ्याची वर्षभर हजेरी लावून परीक्षेस पात्र करायचा.फक्त काही ठराविक प्रॅक्टिकल्स व वार्षिक परीक्षेसाठी विद्यालयात जायचे हा नवा ट्रेंड सुरू झाला आहे.**

**सरकारने पावले उचलावीत..!**

**शिक्षण क्षेत्राच्या बाजारीकरणाला आळा घालण्यासाठी सरकारने वेळीच योग्य ती पावले उचलली पाहिजेत.नाहीतर गरीब कुटुंबातील हुशार विद्यार्थ्यांचे भविष्य पूर्णपणे अंधकारमय होऊन शिक्षण ही केवळ धनदांडग्यांची मक्तेदारी होईल. यात तिळमात्र शंका नाही.**

# वसंतराव नाईक विद्यालयाचा इयत्ता बारावीचा ९९% निकाल




शिराळा : प.पु. स्वामी विवेकानंद सेवाश्रम संस्था शिराळा संचलित स्व. वसंतराव (बाबा) नाईक ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स शिराळाचा इयत्ता १२ वी चा निकाल ९९% लागला. सदर परीक्षेसाठी एकूण १०२ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते त्यापैकी १०१ विद्यार्थी उतीर्ण झाले.

यामध्ये प्रथम क्रमांक हर्षल अनिल पाटील (७०.५०%), द्वितीय क्रमांक विश्वजित सचिन यादव (६८.१७%), तृतीय क्रमांक प्रणाली संतोष बांदिवडेकर (६६.६७%), चतुर्थ क्रमांक तनिष्का दिपक तडाखे (६४.३३%) व पाचवा क्रमांक - विश्वजित प्रशांत पाटील (६३.८३%) यांनी मिळवले. संस्थेचे अध्यक्ष अॅड. भगतसिंग नाईक (नाना), सचिव मा. विश्वप्रतापसिंग नाईक (दादा), उपाध्यक्ष मा. पृथ्वीसिंग नाईक (बाबा), मुख्याध्यापक श्रीधर यादव, प्रा. सुनिल पाटील व सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व उतीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# गाव तसं चांगले..वैरणचोरांनी वेशीला टांगलं

उंब्रज : कळंत्रेवाडी (ता. कराड) येथील शेतकऱ्यांच्या शेतातून वैरण चोरी होण्याचे प्रकार वाढले आहेत. सध्या जीवघेणा उन्हाळा सुरू असल्यामुळे हिरव्या चाऱ्याची कमतरता भासत त्यामुळे ऐन उन्हाळ्यामध्ये हे वैरण चोर शेतातील वैरण फस्त करत असल्यामुळे शेतकऱ्यांपुढे आपले पशुधन जगवायचे कसे? हा मोठा प्रश्न पडला आहे.

आधीच उन्हाळा अनं त्यात वैरणीची कमतरता असल्यामुळे उपलब्ध वैरण साठा पुरवून पुरवून पशुधन जगवताना शेतकऱ्यांची मोठी कसरत होत आहे. अनं त्यात वैरण चोरांनी मांडलेला हा उच्छाद म्हणजे दुष्काळात तेरावा महिना म्हणायची वेळ येथील शेतकऱ्यांवर आली आहे. हे वैरण चोर आपल्या बापाचे शेत असल्याच्या अविर्भावात बिनधोकपणे शेतामध्ये घुसून शेतकऱ्यांनी मोठ्या कष्टाने वाढवलेल्या चारावर्गीय पिकांवर डल्ला मारत आहेत.

शेतकऱ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे.हे सोकावलेले वैरणचोर परगावचे नसून स्थानिक



रहिवासी आहेत. कित्येक वेळा काही शेतकऱ्यांना वैरण चोरताना रंगेहात सापडल्यानंतर अनेकदा हे वाद काही संयमी शेतकऱ्यांनी मध्यस्थी करून चोरींच्या प्रकरणांवर पडदा टाकत आल्यामुळे मुद्द्यावरून गुद्द्यावर येता येता राहिल्याचे येथील शेतकरी सांगतात.

वैरण चोरताना सापडल्यानंतर काहीतरी थातूरमातूर सांगून परत असे करणार नाही. असे म्हणून वेळ मारून नेणे आणि पुन्हा ये रे माझ्या मागल्या या म्हणीप्रमाणे थोडे दिवस वातावरण शांत झाल्यानंतर एखाद्या शेतकऱ्याच्या शेतातील वैरणीवर डल्ला मारणे अशाच प्रकारे या वैरणचोरांनी आजवर आचरण केल्याचे दिसून येते. दुसऱ्याच्या शेतातील वैरणीवर बिनधोकपणे हक्क सांगून डल्ला मारीत वैरण मालकाची जनावरे उपाशी ठेवून स्वतःची जनावरे जगवण्यात कसली आलीय कर्तबगारी? कोणता पुरूषार्थ? सर्व काही विनासायास,फुकट मिळावे.

या हव्यासापोटी वैरणचोर हा शिक्का,बिरूदावली समाजाकडून माथ्यावर मारून घेत तो मी नव्हेच या अविर्भावात समाजात ताट मानेने वावरणारे हे वैरणचोर निर्लज्जम सदासुखीच म्हणावे लागतील. ज्या शेतकऱ्यांच्या शेतातील वैरण चोरीला गेली तो शेतकरी हळहळणारच, शिव्या शाप देणारच अशा पराकोटीच्या हळहळीची, शिव्या शापांनी युक्त अशी वैरण आपल्या जनावरांना घालून त्यातून मिळणारे दूध तुमच्या लेकरा बाळांना आरोग्य तसेच त्या दुधापासून मिळणारा पैसा हा तुमच्या कुटुंबाला सुख-समृद्धी कदापिही देऊ शकत नाही.

उलट शेतकऱ्यांचे शिव्या शाप,हळहळ तुमच्या कुटुंबाला रसातळाला नेऊ शकतात यात तीळमात्र शंका नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी खत पाणी घालून कष्टाने पिकवलेल्या वैरणीवर डोळा ठेवून आयता डल्ला मारणाऱ्या भुरट्या,फुकट खायला सोकावलेल्या, नतदृष्ट भामट्या वैरणचोरांनो अजून वेळ गेली नाही. आता तरी सुधरा. वेळीच तुमच्या कुजक्या,सडक्या मेंदूला ताळ्यावर आणा.म्हणजे झाकली मूठ सव्वा लाखाची राहील.नाहीतर तुमच्या त्रासाला वैतागलेले शेतकरी एक दिवस तुमच्या ढुंगणावर पोकळ बांबूचे चार फटके टाकून तुमची इभ्रत चव्हाट्यावर मांडल्याशिवाय राहणार नाहीत हे मात्र नक्की...!

**अंथरूण पाहून पाय पसरावेत**

**स्वतःची जनावरे स्वतःच्या जमिनीतून पिकवलेल्या चाऱ्यावरती जगवण्याची आपली कुवत,ऐपत,मानसिकता नसेल तर कशाला जनावरे पाळायची? त्यामुळे आपले अंथरूण पाहून पाय पसरणे कधीही हितकारक असते.**

दैनिक कृष्णा एक्सप्रेस हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक आणि मालक गोरख काशिनाथ तावरे यांनी सक्सेस प्रिंटर्स, फा. प्लॉट नंबर १२६/३अ, प्लॉट नंबर ८, कृष्णा कॅनॉल, सैदापूर ता. कराड जि. सातारा पिन - ४१५१२४ येथे छापून, ३७५, गाळा नंबर ४ शनिवार पेठ, कराड ता. कराड जि. सातारा - ४१५११० येथून प्रकाशित केले. * संपादक - गोरख काशिनाथ तावरे

DAILY KRISHNA EXPRESS Printer, Published and Owner by Gorakh Kashinath Taware Pritnted at Success Printers F. plot No. 126/3A, Plot No.8, Krishna Canol Saidapur, Tal- Karad, Dist- Satara Pin-415124, and Published at 375, Shop No.4, Shaniwar Peth, Karad, Tal- Karad, Dist.- Satara 415 110. Editor - Gorakh Kashinath Taware

# शासकीय सेवा ऑनलाईन देऊन नागरिकांचे जीवन सुखकर करा : संजय काटकर




सातारा : शासनाकडून देण्यात येणाऱ्या सेवा नागरिकांपर्यंत जलद पोहोचवून नागरीकांचे जीवन सुखकर बनविण्यासाठी ऑनलाईन सेवा देण्याचे धोरण अवलंबिले आहे. यासाठी सर्व सेवा ऑनलाईन देऊन नागरिकांचे जीवन सुखकर करा, असे आवाहन महा आयटी कॉर्पोरेशन मुंबई चे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवनात सातारा जिल्ह्यातील सर्व शासकीय विभाग प्रमुखांसोबत राईट टू सर्व्हीस अंमलबजावणी आणि ऑनलाईन सेवा पुरविणाऱ्या केंद्र चालकांच्या क्षेत्रीय कामकाजाबाबत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीस उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) अर्चना वाघमळे, जिल्हा उपनिबंधक संजयकुमार सुद्रीक, पाटणचे प्रांताधिकारी सोपान टोम्पे, जावळी (मेढा) तहसीलदार श्री. कोळेकर आदी उपस्थित होते.

शासनाकडील सेवा मिळवणे हा नागरीकांचा अधिकार झाला असून त्या सेवा अधिसुचित होऊन लवकर मिळण्यासाठी ऑनलाईन उपलब्ध झाल्या पाहिजेत हा शासनाचा मानस आहे, असे सांगून श्री. काटकर म्हणाले, शासनाने १५ ऑगस्ट पर्यंत जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन करण्याचे निर्देश दिले आहेत, नागरिकांच्या समस्या सोडवू शकलो तरच नागरिकांमध्ये प्रशासनाविषयी पारदर्शी, सकारात्मक वातावरण होईल. ऑनलाईन सेवा देताना येणाऱ्या तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी वापरण्यात येणारे तंत्रज्ञान अद्ययावत करण्यात येणार आहे. इंटरनेटसह पायाभूत सूविधा देण्यात येणार आहे. क्षमता बांधणीसाठी शासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच सेवाकेंद्राच्या कर्मचाऱ्यांना उपयोगी असे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. यासाठी शासनाने तरतूदही केली आहे, असेही ते म्हणाले. या बैठकीत शासकीय कार्यालय प्रमुखांसह, शासनाच्या विविध ऑनलाईन सेवा पुरविणाऱ्या केंद्रचालक यांनी ऑनलाईन सेवेतील येणाऱ्या अडचणी मांडल्या.

# राष्ट्रवादी युवक जिल्हाध्यक्षपदी जतचे विवेक कोकरे



शिराळा : राष्ट्रवादी काँग्रेसच्या पक्ष कार्यालयात जिल्हा युवक अध्यक्ष व तालुका पक्ष निरीक्षक पदाच्या निवडी पार पडल्या. युवक जिल्हाध्यक्षपदी जतचे विवेक कोकरे यांची निवड करण्यात आली. निवडीनंतर श्री. कोकरे यांचा पक्षनिरीक्षक अरुण असबे, आमदार अरुणअण्णा लाड, जिल्हाध्यक्ष देवराज पाटील व विराज नाईक यांचे हस्ते निवडीचे पत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. विराज उद्योग समूहाचे अध्यक्ष विराज नाईक यांच्यासह प्रमुख मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी राष्ट्रवादीचे कार्याध्यक्ष बाबासाहेब मुळीक, सरचिटणीस बाळासाहेब पाटील, मिरजेचे मनोजबाबा शिंदे, कवठेमंकाळच्या अनिताताई सगरे, जिल्हा बँकेचे संचालक मन्सूर खतीब, ताजुद्दीन तांबोळी, महिला जिल्हाध्यक्षा सुष्मिता ताई जाधव शिराळा तालुकाध्यक्ष बी. के. नायकवडी, संजय बजाज, राजू जानकर, अजित दुधाळ आदी मान्यवर, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व तालुका निरीक्षकांच्या निवडी करण्यात आल्या. त्यांनाही निवडीचे पत्र देऊन सत्कार करण्यात आला.

# टिळक कनिष्ठ महाविद्यालयाचे उच्च माध्यमिक परीक्षेत उज्ज्वल यश





कराड : शिक्षण मंडळ,कराड संचालित टिळक हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाने उच्च माध्यमिक परीक्षेमध्ये उज्ज्वल यश संपादन केले आहे. कला शाखेचा निकाल ९४.५२%,वाणिज्य शाखेचा निकाल१००% तर विज्ञान शाखेचा निकाल९७.५०% लागला आहे.

कोल्हापूर विभागीय बोर्डाचा एकूण निकाल ९३.६४ तर महाविद्यालयाचा एकूण निकाल ९६.४७% लागला आहे.कला शाखेत ३ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर १९ विद्यार्थी प्रथम वर्गात उत्तीर्ण झाले आहेत. वाणिज्य शाखेत ६ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर २० विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेत ०१ विद्यार्थी विशेष प्राविण्य तर ०८ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेत सानिका रामचंद्र गरुड हिने ९१.३३%,वाणिज्य शाखेत वर्षाकुमारी पहाडाराम पुरोहित हिने ८८.८३% तर विज्ञान शाखेत ओम धनंजय जगताप यांने ८१.५०% गुण मिळवून महाविद्यालयात प्रथम क्रमांक संपादन केला.ओम धनंजय जगताप यांने संस्कृत भाषेत१०० पैकी ९९ गुण प्राप्त करू करून विशेष प्राविण्य संपादन केले. कोल्हापूर विभागीय बोर्डात उच्च गुणवत्ताधारक महाविद्यालय म्हणून टिळक कनिष्ठ महाविद्यालयाची ओळख आहे.

कराड ग्रामीण,पाटण,खटाव,कडेगाव व वाळवा परिसरातून ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थिनी कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेतात.महाविद्यालयात शैक्षणिक सत्राच्या पहिल्याच दिवशी अहिल्याबाई होळकर योजनेतून विद्यार्थिनींसाठी मोफत प्रवास पास दिला जातो. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शिक्षण मंडळ कराडचे चेअरमन बाळासाहेब कुलकर्णी,व्हाईस चेअरमन अनघा परांडकर,सचिव चंद्रशेखर देशपांडे,सहसचिव राजेंद्र लाटकर,संचालक बॅरिस्टर विक्रम कुलकर्णी,इतर सर्व संचालक,महाविद्यालयाचे प्राचार्य धनाजी देसाई,उपप्राचार्य अरुण कोडोली,संस्था नियुक्त पर्यवेक्षिका भाग्यश्री देशमाने,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले.

## १२ वी परीक्षेत छ.शाहू अकॅडमीचे उज्वल यश

सातारा – इ.१२ वी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत विद्यावर्धिनी चॅरिटेबल ट्रस्ट संचलित छ. शाहू अकॅडमी अँड ज्युनियर कॉलेज सातारा या विद्यालयाचा निकाल ९९.३५ टक्के लागला. परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उज्वल यश संपादन केले. विद्यालयातील स्वरा निलेश तांबोळी हिने ९४.०५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला. सिद्धी विजयकुमार पाटील हिने ९२.३३ टक्के गुण मिळवून द्वितीय तर, अजीम इम्रान मोमीन याने ९० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक मिळवला. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा श्रीमंत छ. सौ. वेदांतिकाराजे भोसले, प्राचार्य सौ. डिंपल जाधव आणि सर्व शिक्षक, कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# ढेबेवाडी कुस्ती मैदानातील प्रथम क्रमांची कुस्ती बरोबरीत



ढेबेवाडी (महेश जाधव) : ढेबेवाडी (ता. पाटण) येथील श्री लक्ष्मीदेवी मरीआई यात्रेनीमीत्त आयोजीत केलेल्या जंगी कुस्त्यांमध्ये अनेक जिल्ह्यातुन पैलवानांनी हजेरी लावलेली

कुस्तीमैदानात प्रथम क्र १ लाख ५१ हजार रुपयाची कुस्ती पै अशोक मोहीते ( कराड) व पै प्रदीप ठाकूर ( सांगली )यांची कुस्ती बरोबरीत सोडवण्यात आली.व्दितीय क्र कुस्तीचा विजेता पै सुरज पाटील ( शित्तुर) हा ठरला .तृतीय क्र सह्याद्री केसरी कीताब व मानाची गदा कुस्तीचा विजेता पै मयुर पाटील ( पुणे ) तर मरीआई लक्ष्मी केसरी मानाची गदा व कीताब याचा माणकरी कुंडल वरुन आलेला पै संकेत माने ठरला. मैदानात एक हजार पासुन एकलाख एक्कावंन्न हजार रुपये पर्यंतच्या कुस्त्या जोडल्या गेल्या. छोट्या पैलवांनाच्या देखील चाळीसहुन आधीक प्रेक्षणीय व रंगतदार कुस्त्या झाल्या .कुस्तीपटुंनमधील चुरस आणी तांत्रीक कौशल्य पाहुन प्रेक्षक भाराहुन गेले. प्रत्येक झुंजीला जोरदार प्रतीसाद मिळाला.आणी मैदानात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.या कुस्ती मैदानाचे निवेदन पैलवान रमेश थोरात यांनी केले .हलगी वादकांनी मैदानात हलगी वाजउन पैलवानांना प्रोत्साहान दिले.मैदानात ढेबेवाडी पंचक्रोशीतील शौकींनांनी उपस्थीती लावली होती.

माजी कृषी सभापती हिंदुराव पाटील, ढेबेवाडी गावचे माजी सरपंच संजय पाटील, उपसंरपंच अभिजीत कडव ,आनंदराव पतसंस्थेचे चेअरण अभीजीत पाटील , सदस्य सोमनाथ पाटील , सदस्य हरी ढेब, सदस्य प्रसाद देवळेकर, नाना साबळे , नारायण कारंडे , रेडीज गुरुजी, धारेश्वर पवार,तमीज डांगे , जमीर डांगे ,आण्णा कारंडे समस्त यात्रा कमीटी आदी मान्यवर उपस्थीत होते.

**कुस्ती निवेदकाचा नादच नाय**

**दुध डेअरीला घालु नका पोराला पाजा घरात एक तरी पैलवान तयार करा.अहो कोण विचारत तुमचा बँक बँलेन्स? कोण वाचारत तुमची ईस्टेट पण तालमीत जाणार पोरग गावातन चालत निघाल तर लोक विच्यारत्याती हा पोरगा कुणाचा ? कुस्ती निवेदक रमेश थोरात यांच्या अशा बहारदार निवेदनामुळे कुस्ती मैदानाला रंगत चडल्याचे पहायला मिळाले.**

# सहकाररत्न मा राजेंद्र शेठ राजपुरे यांचा वाढदिवस उत्सहात



महाबळेश्वर(विकास जंगम) : महाबळेश्वर तालुक्याचे युवा रत्न तसेच सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक सहकाररत्न मा .श्री राजेंद्र शेठ राजपुरे यांचा वाढदिवस खूप मोठ्या उत्सहात व आनंदात मौजे राजपुरी तालुका महाबळेश्वर येथे साजरी झाला.

राजेंद्र शेठ राजपुरे यांनी ग्रामदैवत कार्तिकस्वामी व वाकडेश्वर देवांचे दर्शन घेतले व पत्नी माजी सभापती सौ रुपाली राजपुरे यांनी त्यांचे औक्षण केले. व गावातीलच असणारे विठ्ठल रुखुमाई मंदिर मध्ये आयोजित बालाजी ब्लड सेंटर सातारा यांच्या कडून भव्य रक्तदान शिबिर आयोजित केले होते. त्यांचे फीत कापून रक्तदानास सुरुवात केली. एकूण १०३ रक्त दात्यांनी रक्तदान केले. प्रत्येक रक्त दात्यास भेटवस्तू हि देण्यात आल्या.

तसेच येणाऱ्या प्रत्येक कार्यकर्त्यांना अल्पउपहार सोय करण्यात आली होती. महाबळेश्वर तालुक्या मध्ये जवळ आसपास ११० गावे आहेत मा राजेंद्र शेठ राजपुरे यांचे प्रत्येक गावा मध्ये कार्यकर्ते आहेत. शुभेच्या वर्षाव देताना प्रत्येक गावातील ग्रामस्थ ग्रामपंचायत सरपंच , सदस्य , बँक कर्मचारी , राजकीय नेते, असे भरभरून लोक वाढदिवसाचा शुभेच्या देण्याकरिता येत होते.मा उपमुख्यमंत्री श्री एकनाथ शिंदे साहेब – अजित दादा पवार ,खासदार उदयनराजे भोसले, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील , सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिह राजे भोसले ,आमदार राम राजे निबाळकर साहेब , आमदार शशिकांत शिंदे , माजी खासदार श्रीनिवास पाटील , सातारा जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई , प्रभाकर घार्गे साहेब , यांनी फोन वरून शुभेच्या दिल्या. राजेंद्रशेठ यांच्या वर असणारे प्रेम ही लोकांच्या उपस्थितीची साक्ष देत होता .

मा राजेंद्रशेठ राजपुरे यांना संपूर्ण महाराष्ट्र ओळखतो पुरोगामी विचारांची मनाशी खुणगाठ बांधून सार्वजनिक जीवनात एक तत्वनिष्ठ लोकहितवादी नेतृत्व उदयास आले आहे .

निस्वार्थी स्वभाव, स्वच्छ चरित्र , जनहितासाठी सुदैव राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उपमुखमंत्री अजित दादा व मदत पुनर्वसन मंत्री वाई खंडाळा महाबळेश्वर तालुक्याचे जननायक आमदार मा मकरंद आबा पाटील यांच्या विचारावर चालणारे राजेंद्र शेठ राजपुरे नावलौकिक आहेत.

संपूर्ण महाबळेश्वर तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मधील ११३ प्राथमिक शाळांमधील २५०० विध्यार्थी तसेच तालुक्यातील अनुदानित १६ माध्यमिक विद्यालयातील सुमारे ८०० विध्यार्थ्यांना प्रत्येकी ४ वह्यांचा संच भेट देण्यात आला.

या मुले विध्यार्थी आनंदाच्या भरात हरवून गेले. वह्यांचे प्रकाशन करताना खा. नितीन काका म्हणाले युवा कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्याचा वाढदिवस अतिशय साध्या परिस्तिथी मध्ये साजरा करून समाजाला योग्य दिशा देणारा उपक्रम हाती घेत शालेय विध्यर्थ्याना वह्या वाटप करून वाढदिवस साजरा करणे म्हणजे सामाजिक दाईत्व निभवने होय.

हा उपक्रम समाजाला प्रेरणादाई ठरेल अशी भावना व्यक्त केली. तालुक्याचे दमदार मदत पुनर्वसन मंत्री आमदार मा श्री मकरंद आबा पाटील तसेच महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री मा श्री अजितदादा पवार यांच्या माध्यमातून त्यांनी डोंगरी भागाच्या विकासाला बळ दिले गेले आहे. त्यांना वाढदिनी दीर्घायुष्य लाभो हिच प्रार्थना

# पोर्टलमधून अर्ज भरताना अडचणी

शिराळा : मैत्री पोर्टलमध्ये महाराष्ट्र विद्युत वितरण कंपनीच्या औद्योगिक कनेक्शनमधून अर्ज दाखल करताना अनेक अडचणी येत आहेत. याबाबत शिराळा शहर शिवसेनेच्यावतीने (शिंदे गट) नायब तहसीलदार राजेंद्र पाटील यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, गेले सहा महिने झाले तरी, मैत्री पोर्टलमधून एकही महावितरणचा औद्योगिक कनेक्शनचा अर्ज दाखल झाला नाही. त्यामुळे नव्याने व्यवसाय सुरू करणाऱ्या उद्योजकांना विद्युत कनेक्शन न मिळाल्यामुळे उद्योग सुरू करण्यास अडचणी निर्माण होत आहेत. शिवसेना शहरप्रमुख नीलेश आवटे, शिवसेना उपतालुकाप्रमुख सतीश काटे, युवा सेना तालुकाप्रमुख आकाश पाटील, शिवसेना विभागप्रमुख अतुल पाटील, अक्षय पाटील, जावेद नदाफ, मराठेवाडीचे सरपंच श्याम मराठे उपस्थित होते.

# यशवंतराव चव्हाण विद्यालयात माजी विद्यार्थी मेळावा संपन्न




कराड : यशवंतनगर (ता. कराड) येथील सह्याद्री शिक्षण संस्थेच्या यशवंतराव चव्हाण विद्यालयाच्या २००७ च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा नुकताच उत्साहात पार पडला. कार्यक्रमासाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक ए.एस. राऊत यांच्यासह सेवानिवृत शिक्षक ए.आर अर्जुगडे, ए.आर गुरव , जी.पी. माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

२००६-०७ च्या एस.एस.सी. बॅचचे शालांत शिक्षण पूर्ण करून उच्च शिक्षणासाठी बाहेर पडलेले विद्यार्थी पुढील कालखंडात उच्चविद्याविभुषीत होऊन पुणे, मुंबईसह राज्याच्या विविध भागांत नोकरी व्यवसायानिमित्त स्थिर झाले,परंतु शालेय जीवनातील बऱ्याच कटू-गोड आठवणी, गंमतीजमती, शिक्षकांनी दिलेल्या शिक्षा, कोडकौतुक प्रत्येकाच्याच मनात कायमच्या घर करून राहिल्या होत्या. ओढ होती जुन्या सवंगड्यांसह गुरुजनांना प्रत्यक्ष भेटण्याची. माजी विद्यार्थी आकाशनंद पवार,तुषार चव्हाण,एकनाथ पवार रेश्मा जाधव यांनी पुढाकार घेत जुने सवंगडी समाजमाध्यमांच्या मदतीने एकत्र जोडले आणि नेटके नियोजन करून स्नेहमेळावा यशस्वी केला.

प्रसंगी माजी विद्यार्थ्यांनी आपल्या गुरुजनांचा कृतज्ञतापूर्वक सन्मान केला, पराग कदम, सूरज चव्हाण,सागर सावंत,पल्लवी, जाधव, सीमा रविढोणे, सूरज यादव, अभिजित चव्हाण यांनी १९ वर्षांपूर्वीच्या शालेय आठवणींना उजाळा देत आपली मनोगते व्यक्त केली. शाळेच्या माजी शिक्षकांनी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे कौतुक केले व या मेळाव्यामुळे शिक्षक-विद्यार्थी स्नेह वृद्धिंगत होण्यास मदत होईल असे मत व्यक्त केले.गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी नावलौकिक असलेल्या या विद्यालयातील अनेक माजी विद्यार्थी प्रशासकिय सेवेत उच्च पदावर व बरेच विद्यार्थी व्यवसाय, उदयोग, नोकरीत कार्यरत आहेत. शाळेप्रती कृतज्ञता म्हणूण सर्व माजी विद्यार्थ्यातर्फे शाळेला क्रिडा साहित्य भेट म्हणूण प्रदान करण्यात आले. यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थ्यासह विद्यालयाचे कर्मचारी सुनिल नांगरे, अधिकराव चव्हाण यांनी मेहनत घेतली. सूत्रसंचलन हेमा काशिद यांनी केले. अविनाश डुबल यांनी आभार मानले.

# प्रेरणा फाउंडेशन सामाजिक संस्थेचा ७ वा वर्धापन दिन

## सत्कर्म आश्रमात मुलांसाठी मोफत आरोग्य शिबीर

## सामाजिक पुरस्कार वितरण सोहळा साजरा



बदलापूर(गुरुनाथ तिरपणकर) : प्रेरणा फाउंडेशन ७ वा वर्धापन दिन सोहळा, सत्कर्म बालकाश्रम, बदलापूर येथे मोफत आरोग्य शिबीर व पुरस्कार वितरण करून वर्धापन दिन साजरा करण्यात आला आहे. मोफत आरोग्य तपासणी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन प्रेरणा फाउंडेशनच्या संस्थापिका अध्यक्षा सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी यांनी केले. रामजीत गुप्ता, डॉ. पारुल लाड महेंद्रू, डॉ.राहत शेख, फाउंडेशनचे सचिव वैभव कुलकर्णी, खजिनदार रोहन गावकर, अविनाश म्हात्रे, मंगेश सावंत यांचे विशेष सहकार्य लाभले.

प्रेरणा इन्स्टिटयूट अंतर्गत येणारे उपन्न सौ.प्रेरणा कुलकर्णी या कॅन्सरग्रस्त, किडनीग्रस्त मतिमंद निराधार लोकांना आधार देण्यासाठी वापरतात. मुख्य तपासी अधिकारी श्री.रामजीत गुप्ता, बृह मुंबई होमगार्ड विभाग श्री.दिलीप नारकर, वैद्यकीय तपासणी सहायक अधिकारी धनंजय पवार. दीनदयाल कुष्ठरोग संस्था, अध्यक्ष श्री. अविनाश म्हात्रे, श्री. रघुनाथ फडके, सौ. श्रुती आठल्ये, समाजसेवक श्री.राम घरत, फिजिओ थेरपिस्ट डॉ.पारुल लाड महेंद्रू, सौं राजकुमारी गुप्ता, डॉ.राहत शेख, मा.पी.एस. कदम उपस्थित होते.

जनजागृती सेवासमिती अध्यक्ष श्री.गुरुनाथ तिरपणकर, सत्कर्म आश्रमचे अध्यक्ष नामदेव पेशने, सचिव मकरंद वढवेकर यांची उपस्थिती होती. सौ. प्रेरणा वैभव कुलकर्णी श्री.वैभव कुलकर्णी यांनी सूत्र संचालन मानले.

# कर्मयोगिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुस्तकाचे प्रकाशन




चिंचवड : आंतर्राष्ट्रीय कामगार दिन आणि महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त नारायण सुर्वे साहित्य कला अकादमी आयोजित तेहतिसाव्या श्रमउद्योग परिषदेत विविध पुरस्कार प्रदान सोहळा प्रा.डॉ.राजा दीक्षित,मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे माजी अध्यक्ष यांच्या हस्ते विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. ८९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा.डॉ.श्रीपाल सबनीस यांनी परिषदेचे उद्घाटन केले. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या प्रमुख कार्यवाह डॉ. सुनीताराजे पवार अध्यक्षस्थानी होत्या. नारायण सुर्वे साहित्य कला अकादमीचे अध्यक्ष सुदाम भोरे, पुरुषोत्तम सदाफुले प्रमुख उपस्थित होते.

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ,मुंबईचे कल्याण आयुक्त रविराज इळवे यांना 'पद्मश्री नारायण सुर्वे जीवनसाधना सन्मान' देवून सन्मानित करण्यात आले.'मास्तरांची सावली कृष्णाबाई नारायण सुर्वे सन्मान' चारुलता माधव पवार यांना, कष्टकरी महासंघ या संघटनेचे अध्यक्ष काशिनाथ नखाते यांना 'नारायण मेघाजी लोखंडे स्मृती कष्टकरी हितसंवर्धन संघटना पुरस्कार'; माणिकराव ढोकले यांना 'यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र उद्योगभूषण पुरस्कार' प्रदान करण्यात आले. पुरुषोत्तम सदाफुले यानी पुरस्कार निवडीबाबत भूमिका मांडली.

डॉ. सुनीताराजे पवार यांनी 'जगातील सर्वोत्तम गोष्टी कामगारांच्या कष्टांतून निर्माण झालेल्या आहेत.अर्धे जग महिलांनी व्यापले असून विषमतेची दरी कमी करून त्यांचा मान राखला जावा अशी अपेक्षा व्यक्त केली. बाजीराव सातपुते यांनी 'एकटाच आलो नाही,युगाचीही साथ आहे' या व्याख्यानातून नारायण मेघाजी लोखंडे आणि नारायण सुर्वे यांचा जीवनपट मांडला. संपूर्ण मानवांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवन चरित्राची ओळख व्हावी यासाठी सौ.प्रतिमा काळे लिखित कर्मयोगिनी अहिल्यादेवी होळकर या पुस्तकाचे प्रकाशन झाले.

सर्वांच्या घरी या पुस्तकाचे पारायणे व्हावीत. जेणे करून पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी जे जे कार्य केले त्याची ओळख या निमित्ताने होईल.प्रत्येक घरी हे पुस्तक पोहचले पाहिजे. असा मानस लेखिका,कवयित्री सौ.प्रतिमा काळे यांनी व्यक्त केला.

# बरड जिल्हा परिषद शाळेचे विविध मैदानी स्पर्धेत यश



फलटण : तिसऱ्या राज्यस्तरीय थलेटि स्पर्धे त बरड जिल्हा परिषद शाळेचे विविध मैदानी स्पर्धेत घवघवीत यश प्राप्त झाले आहे . नुकत्याच नाशिक येथे नाशिक थलेटिक फाउंडेशन यांचेवतीने राज्य स्तरीय स्पर्धेमध्ये बरड (ता.फलटण) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये यश मिळवलेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे अडथळा रनिंग मध्ये १८ वर्षाखालील गटात कु ईश्वरी हनुमंत पवार इयत्ता सहावी प्रथम क्रमांक, लांब उडीमध्ये कु- माधुरी प्रकाश पवार इयत्ता पाचवी या विद्यार्थिनीचा तृतीय क्रमांक .

निखिल सुरेश पवार इयत्ता आठवी याचा लांब उडीमध्ये तृतीय क्रमांक आला. साई हेरंब सावळकर, इयत्ता तिसरी राज हेरंब सावळकर,इयत्ता तिसरी आराध्य अरविंद जाधव, इयत्ता तिसरी,४÷५० रिलेमध्ये द्वितीय क्रमांक, रोहित साधू देवकाते इयत्ता सहावी आयुश हनुमंत पवार, इयत्ता पाचवी माधुरी प्रकाश पवार, इयत्ता पाचवी काव्या समाधान देशमुख इयत्ता पाचवी. यांचा १२ वर्ष गटात ४÷१०० मिक्स रिले मध्ये- तृतीय क्रमांक स्वरा केदार शहाणे इयत्ता सहावी , ईश्वरी हनुमंत पवार, इयत्ता सहावी ,स्नेहा सचिन मोरे इयत्ता सहावी ,माधुरी प्रकाश पवार इयत्ता पाचवी.१२ वर्षाखालील (मुली)४÷१०० रिलेमध्ये तृतीय क्रमांक, गौरव संतोष गावडे इयत्ता सहावी अथर्व यशवंत पडळकर, इयत्ता सातवी , ध्रुव महेश लोंढे,इयत्ता आठवी ,ओम कुंभार इयत्ता पाचवी. यांचा १४ वर्षाखालील मुले रिले मध्ये तृतीय क्रमांक. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे बरड शाळेचे मुख्याध्यापक उदय नाळे, विलास बनकर सर,परमेश्वर नाईक ननवरे, क्रीडा मार्गदर्शक अजित कर्णे सर यांनी अभिनंदन केले. गावाचे सरपंच प्रकाश लंगुटे, शाळा व्यवस्थापन समितिचे अध्यक्ष संतोष आडके, संतोष गावडे, हनुमंत पवार, हणमंत शिंदे,महेश लोंढे, विकी शहाणे, यशवंत पडळकर उपस्थित होते.

# महाआरोग्य तपासणी शिबिराचा हजारो रुग्णांना लाभ



सातारा- साताऱ्यात कर्तव्य सोशल ग्रुप, सातारा आणि अथायु हॉस्पीटल, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच झालेल्या मोफत महाआरोग्य तपासणी शिबीरराचा हजारो रुग्णांना लाभ झाला. असंख्य रुग्णांची मोफत तपासणी करून आवश्यक औषधोपचार करण्यात आले. येथील कला, वाणिज्य महाविद्यालय, कोटेश्वर मैदान सातारा येथे झालेल्या या शिबिराचे उदघाटन कर्तव्य सोशल ग्रुपच्या संस्थापिका श्रीमंत छ. सौ. वेदांतिकाराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. शिबिरात हॉस्पिटलचे सीईओ आणि कॅन्सर स्पेशालिस्ट डॉ. बसवराज कडलगे, डॉ. राहुल चौगुले, ओंकार कदम, शीतल कात्रे, अनुजा पाटील, मदन गोरे आदी तज्ज्ञांनी रुग्णांची टॅप्सनी केली.

यावेळी हाडाचे फ्रॅक्चर (अपघात मध्ये मोडलेली हाड), अँजिओप्लास्टी, बायपास, पेसमेकर, दुर्बिणीद्वारे मुतखडा ऑपरेशन, दुर्बिणीद्वारे प्रोस्टेट ऑपरेशन, सर्व प्रकारचे कॅन्सर ऑपरेशन, केमोथेरपी, केमोथेरपी पोर्ट, डायलिसिस, ए व्ही फिश्चुला (डायलिसिस रुग्णांसाठी), पमकॅथ (डायलिसिस रुग्णांसाठी), दुर्बिणीद्वारे पित्ताशयाचे खडे ऑपरेशन, लेसरद्वारे व्हेरिकोज व्हेन्स उपचार, वाढलेली थायरॉईड गाठी वर मायक्रोवेव द्वारे (विना ऑपरेशन) अत्याधुनिक उपचार, विना टाके गर्भाशय गाठी वर उपचार, पायांची पेरिफरल अँजिओप्लास्टी (मधुमेह मुळे पायाला झालेली इजा), प्रोस्टेट आर्टरी एम्बोलायझेशन यांची तपासणी व उपचार करण्यात आले. तसेच शिबिरात मोफत ई. सी. जी., अँजिओग्राफी, रक्तातील साखर तपासणी, लघवीची धार तपासणी, प्रोस्टेट विशिष्ट अँटीजेन तपासण्या करण्यात आल्या. शिबीर यशस्वी करण्यासाठी कर्तव्य सोशल ग्रुपच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कॉटेज हॉस्पिटल भिंत ते दीक्षित हॉस्पिटल बोळात कॉँक्रिटीकरण कामाचे भूमिपूजन



कराड : कराड नगरपरिषद हद्दीतील रुक्मिणी नगर परिसरातील कॉटेज हॉस्पिटल भिंत ते दीक्षित हॉस्पिटल शेजारील बाजू येथील बोळात रोड कॉँक्रिटीकरण व रस्ता सुधारणा करणे कामाचे भूमिपूजन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे समर्थक रणजीत (नाना) पाटील यांच्या हस्ते झाला. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या विशेष प्रयतनातून या रस्त्याच्या कामासाठी सुमारे २८ लाख १४ हजार रुपये निधी मंजूर झाला आहे.

रणजीतनाना पाटील यांनी पाठपुरावा केला होता. या रस्त्याच्या कामासाठी निधी मंजूर झाल्याने स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. या प्रसंगी हिम्मतराव माळी उल्हास पावसकर, श्रीकांत जाधव,कमलाकर गोडसे, विजय माळी,गुलाबभाई खोजा, बालम मुलाणी,नाझीम गोटेकर रमेश रुपडा,अविनाश शहा चंद्रकांत पाटील, सुहास गोतपागर, प्रताप इंगवले, महेश पाटील दिलीप पाटील,रोहित पंडीत ,तेजस माने,प्रशांत भोरकडे,सर्फराज बागवान, गणेश पाटील,सचिन पाटील आदी उपस्थित होते.

# कळंत्रेवाडीचा के टी बंधारा गाळाने भरला शेतकरी चिंताग्रस्त;गाळ काढण्याची मागणी



उंब्रज : कळंत्रेवाडी (ता.कराड) येथील उत्तरमांड नदीवर बांधण्यात आलेला केटी बंधारा पाण्यासोबत वाहत आलेल्या गाळामुळे भरला आहे.त्यामुळे अपेक्षित असा पाणीसाठा होत नाही. अलीकडील काळात सदर बंधाऱ्यावरील पाणी उपसा वाढल्यामुळे अवघ्या पंधरा दिवसांमध्येच बंधाऱ्यातील पाणी आटत आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस सुरू आहेत.

भर उन्हाळ्यात पिकांना पाण्याची कमतरता भासत असून शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्यामुळे महसूल तसेच पाटबंधारे विभागाने संयुक्तपणे बंधाऱ्याचा सर्व्हे करून बंधाऱ्यातील गाळ काढण्याची प्रक्रिया सुरू करावी अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.अलीकडील काळात सदर बंधाऱ्यातून वाढलेला पाणी उपसा तसेच दिवसेंदिवस बंधाऱ्यात पाण्याच्या प्रवाहाबरोबर वाहत येणारा गाळ या गोष्टी लक्षात घेता बंधाऱ्याची पाणी साठवून क्षमता दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. शेतकऱ्यांना पिके जगवणे जिकीरीचे बनले आहे. त्याचबरोबर भविष्यात उत्तरमांड नदीच्या पाण्यापासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांकडून पाणी परवान्यांची मागणी वाढून आणखी पाणी उपसा वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**कळंत्रेवाडी बंधाऱ्याचा सर्व्हे करावा**

**महसूल तसेच पाटबंधारे विभागाने बंधाऱ्याच्या आतील भागाचा सर्व्हे करून बंधाऱ्यातील गाळ काढण्याची प्रक्रिया राबवावी त्यासाठी सर्व कागदोपत्री सोपस्कार पूर्ण करू अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.**

त्यामुळे भविष्याचा विचार करून आत्ता बंधाऱ्यातील गाळ काढला नाही तर पाणी प्रश्न आणखी बिकट बनण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# सध्या देशात धार्मिक ध्रुवीकरण केले जात आहे : आ.जयंतराव पाटील




इस्लामपूर : सध्या देशात धार्मिक ध्रुवीकरण केले जात असून सामान्य माणसाचे महागाई, बेकारीसारखे प्रश्न बाजूला पडत आहेत. कार्यकर्त्यांनी या परिस्थितीत अधिक सतर्क रहायला हवे,असे आवाहन राष्ट्रवादी कॉँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष माजी मंत्री आ.जयंतराव पाटील यांनी केले.

आ.पाटील हे संभाजीनगरच्या दौऱ्यावर होते. त्यांनी तिथून भ्रमणध्वनीवरून कार्यकर्त्यांशी संवाद साधत मार्गदर्शन केले. घार फिरे आकाशी,मात्र चित्त तिचे पिलापाशीया उक्तीचा कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांना प्रत्यय आला. याप्रसंगी कामगार नेते शंकरराव भोसले यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

एक तास राष्ट्रवादीसाठी,महाराष्ट्राच्या विकासासाठीया उपक्रमासाठी इस्लामपूर राष्ट्रवादी भवनमध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते एकत्र आले होते. प्रा.शामराव पाटील,पै.भगवान पाटील,बाळासाहेब पाटील,खंडेराव जाधव, अरुण कांबळे,सुनिल मलगुंडे,मुनीर पटवेकर, सुभाषराव सुर्यवंशी,संदीप पाटील उपस्थित होते. आ.पाटील म्हणाले,पाकिस्तान मधून दहशत वादी येतात आणि आपली देशातील निष्पाप लोकांचा बळी घेऊन परत जातात,हे सगळे संताप जनक आहे. एवढ्या मोठया पर्यटन स्थळी बंदोबस्त का नव्हता? या भ्याड हल्ल्याचा देशाने बदला घ्यायला हवा. देशा तील जनता,विरोधी पक्ष सरकार बरोबर आहे. मग आज १०-१२ दिवस झाले,तरी हमला का केला नाही. सध्या देशात सामान्य माणसाची मुस्कटदाबी केली जात आहे. शंकरराव चव्हाण यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. शहाजी पाटील, मुनीर पटवेकर, पुष्पलता खरात, शैलेश पाटील, अभिजित कुर्लेकर यांची भाषणे झाली. एम.जी.पाटील,हणमंत माळी, दिग्विजय पाटील,अभिजित रासकर,रोझा किणीकर,शैलजा जाधव,सचिन कोळी, स्वरूप मोरे,मुकुंद कांबळे,रणजित गायकवाड,संजय जाधव, परेश पाटील,मनिषा पेठकर,संदीप माने, अभिजित भ.पाटील, रविंद्र वाघमोडे,संजय खवळे,सागर चव्हाण, सूर्याजी पाटील,राहुल नागे,मोहन भिंगार्डे, सुहास हांडे,सविता सावंत उपस्थित होते.

# विज्ञान शाखेत पल्लवी काटकर, कला शाखेत आरती जाधव प्रथम




औंध : औंध शिक्षण मंडळाच्या राजा भगवंतराव ज्यु. कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी फेब्रुवारी मार्च मध्ये झालेल्या इयत्ता बारावी परिक्षेत पल्लवी काटकर हिने ८३.१७टक्के विज्ञान शाखेत तर कला शाखेत आरती जाधव हिने ७७.१७टक्के गुण मिळवत औंध केंद्रात प्रथम क्रमांक पटकावला. विज्ञान शाखेत द्वितीय क्रमांक दिपेश फडतरे ८२टक्के, तृतीय क्रमांकआदिती माने८१.१७, चतुर्थ क्रमांक स्वराली यादव ८०.३३,पाचवा क्रमांक श्रावणी ओंबासे व तन्वी नलवडे यांनी ८० टक्के गुण मिळवून पटकावला. कला शाखेत द्वितीय क्रमांक सिध्दी लोकरे ६३.५०टक्के, तृतीय क्रमांक वैष्णवी थोरात व प्रेरणा पवार यांनी ६३.३३टक्के गुण मिळवत पटकावला तर चौथा व पाचवा क्रमांक अनुक्रमे तेजस सोनताटे ६३.१७व श्रेया जाधव ६१.५०टक्के यांनी पटकावला.

ज्युनिअर कॉलेजचा विज्ञान शाखेचा एकूण निकाल ९७.८०टक्के तर कला शाखेचा निकाल ८३.१३टक्के लागला.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे औंध शिक्षण मंडळाचे अध्यक्ष व उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, चेअरमन गायत्रीदेवी पंतप्रतिनिधी,व्हा.चेअरमन चारुशीला राजे पंतप्रतिनिधी, विश्वस्त हणमंतराव शिंदे, अतुल क्षीरसागर, प्रशांत खैरमोडे, राजेंद्र माने, शाकीर आतार, सचिव प्रदीप कणसे,सहसचिव संजय निकम, दिपक कर्पे ,प्राचार्य एस.बी.घाडगे, उपप्राचार्य प्रदीप गोडसे, संभाजी गुजर, प्राध्यापक, सर्व शिक्षकांनी अभिनंदन केले.

# भाजप इस्लामपूर मंडल अध्यक्षपदी संदीपराज पवार यांची निवड



इस्लामपुर : भाजपच्या इस्लामपूर शहर मंडल अध्यक्षपदी संदीपराज पवार यांची निवड झाल्याबद्दल राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या वतीने शाल, श्रीफळ व बुके देऊन सत्कार करण्यात आला. संदीपराज पवार म्हणाले की आगामी काळात महायुतीच्या सर्व घटक पक्षांना एकत्रित घेत इस्लामपूर शहराचा विकास करण्यासाठी कटिबद्ध राहीन. यावेळी राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते भास्कर मोरे, प्रांजली अर्बन बँकेचे चेअरमन अक्षय भोसले- पाटील, भाजपचे माजी तालुकाध्यक्ष निवास पाटील, सयाजीराव जाधव, प्रसाद पाटील, केतन खांबे हे उपस्थित होते.